# येशू खरोखर कोण आहे हे मूले शिकतात

**प्रार्थना:** ''प्रिय प्रभू, मुलांनी येशूच्या जीवनाची प्रशंसा करावी आणि तो एकाच खऱ्या देवाचा मनुष्य झालेला पुत्र आहे; यावर विश्वास ठेवण्यासाठी कृपा करून त्यांचे साहाय्य कर.''

पुढीलपैकी कोणताही कार्यक्रम मुलांना शिकवण्यासाठी निवडा.

मोठ्या मुलाला **लूक** 19:28-40 मधून येशूचा यरूशलेमेमध्ये जयोत्सवाने प्रवेश याविषयी सांगण्यास सांगा. सर्वसामान्य लोकांनी अभिवचनाने मिळलेला मसीहा व राजा अशा सर्व जगाला स्वातंत्र्य व शांती देणाऱ्या येशूची कशी स्तुती केली ते यावरून पहायला मिळते.

वृत्तांत सांगून झाल्यावर पुढील **प्रश्न विचारा** (प्रत्येक प्रश्नापुढे उत्तर दिले आहे)

- येशूला यरूशलेमेमध्ये जाण्यासाठी शिंगरू कसे मिळाले? (पाहा वचन 30)
- शिष्यांनी शिंगराच्या मालकाला काय सांगितले? (पाहा वचन 34)
- मत्तय 21:8 हे वचन सांगते की लोकांनी आपली वस्त्रे वाटेवर येशूसमोर पसरली. त्यांनी आणखी कोणत्या प्रकारे आपला आनंद व्यक्त करून स्तुती केली? (वचने 36-37)
- येशू कोण आहे असे लोक म्हणत होते? (वचन 38)
- येशूने लोकांना गप्प राहण्यास सांगितले तर काय घडेल असे सांगितले? (वचने 39-40)

या प्रसंगाची पार्श्वभूमी उलगडून सांगा.

- येशू त्याला वधस्तंभावर खिळण्याच्या आधीच्या रविवारी यरूशलेमेला आला.
- काही ख्रिस्ती लोक या दिवसाला झावळ्यांचा रविवार असे म्हणतात; कारण, लोकांनी त्याच्या यरूशलेमेच्या वाटेवर झावळ्या पसरल्या होत्या.



- येशू त्याचे मृतांतून पुनरूत्थान होण्याच्या एक आठवडा अगोदर यरूशलेमेमध्ये आला. याच आठवड्यात संपूर्ण इतिहासातील अत्यंत महत्वपूर्ण अशा घटना घडल्या.
- काही पुढारी व सरकारी अधिकारी त्याचा द्वेष करीत होते आणि तो आपल्या अधिकाराच्या जागा हिरावून घेईल अशी त्यांना भीती वाटत होती.
- येशूने अनेक लोकांना बरे करून आरोग्य दिले होते आणि जुन्या करारातील संदेष्ट्यांनी मसीहा येणार असे भाकित केले होते तो हाच हे त्यांना माहीत होते.

- येशू हा देव आहे आणि तो मानव झाला तो देवदूत नाही किंवा देव आणि मानव यांच्यापैकी मधलाच कोणीतरी असा नाही तो देव आणि मानव असा दोन्ही असून स्वर्ग आणि पृथ्वीला जोडणारा एकमेव पूल आहे.

नाट्यीकरण करा येशूचा जयोत्सवाने प्रवेश लूक 19:28-40

- मुलांना ही नाटिका सादर करता यावी यासाठी उपासनेच्या पुढाऱ्याशी चर्चा करून व्यवस्था करा.
- शिकविण्याच्या वेळात मुलांकडून तयारी करून घ्या.
- मोठ्या मुलांनी लहान मुलांकडून तयारी करून घेण्यात मदत करावी.
- सर्व भूमिका करण्यासाठी पुरेसे लोक नसतील तर निवेदकाने त्या भूमिका कराव्यात.
- मोठ्या मुलांनी किंवा प्रौढांनी येशू, गाढव, गाढवाचा मालक आणि निवेदक ह्या भूमिका साकाराव्यात. निवेदकाने वृत्तांताचा सारांश तयार करून मुलाकडून संवाद पाठ करून घ्यावेत.
- लहान मुलांनी शिष्य, परूशी आणि जमावातील लोक ह्या भूमिका कराव्यात. शिष्य व जमावातील लोकांचे काम करणाऱ्या मुलांकडे झाडाच्या फांद्या मोठे झगे किंवा कापड असावे.

**निवेदकः** लूक 19:28-35 मधून वृत्तांताचा पहिला भाग सांगून म्हणावे, ''येशू आपल्या शिष्यांना काय म्हणतो ते ऐका''

**येशूः** ''माझी यरूशलेमेला जाण्याची वेळ झाली. शेजारच्या गावातून एक शिंगरू इकडे घेऊन या. कोणी विचारले तर प्रभूला याची गरज आहे असे सांगा.''

**शिष्यः** गाढवाकडे जाऊन त्याला सोडत असल्याचा अभिनय करा.

**गाढवाचा मालकः** ''ए थांबा थांबा! माझ्या गाढवाचे तुम्ही काय करता?''

**शिष्यः** ''प्रभूला याची गरज आहे.''

**गाढवाचा मालकः** ''असे आहे का मग घेऊन जा''

**शिष्यः** गाढव घेऊन येशूकडे या.

**येशूः** गाढवावर बसा.

**गाढवाचा मालकः** ''बघा बघा! येशू माझ्या गाढवाच्या शिंगरावर बसून चालला आहे. त्याच्यावर आजपर्यंत कोणीच बसले नव्हते!''

**निवेदकः** लूक 19:36-40 मधून वृत्तांताचा दुसरा भाग सांगून म्हणा जमावातील

**लोकः** येशूच्या समोर वाटेवर झगे किंवा कपडे पसरा हातातल्या फांद्या हालवून त्या खाली पसरा मोठ्याने ओरडा, ''ऊर्ध्वलोकी देवाला गौरव'' ''होसान्ना!'' ''राजा येत आहे!''

**परूशीः** (संतापाने) येशू तुझे शिष्य ओरडत आहेत, त्यांना गप्प बसायला सांग!''

**येशूः** त्यांनें म्हटलें मी तुम्हांस सांगतों हे उगे राहिल्यास धोंडे ओरडतील

**निवेदक किंवा मोठे मूलः** नाटिका संपल्यावर प्रत्येकाचे आभार माना.

**प्रश्न** मुलांनी हे नाट्यीकरण प्रौढांसमोर सादर केले असेल तर वर दिलेले प्रश्न त्यांनी प्रौढांना विचारावेत

**कविता** काही मुलांना स्तोत्र 118:22-24,26 व 28 ही वचने म्हणण्यास सांगा.

विचारा आमचा प्रभू व राजा असणाऱ्या येशूची आम्हाला आणखी कोणत्या प्रकारे स्तुती करता येते याची उदाहरणे मुलांना विचारा मुलांना व प्रौढांना उदाहरणे देण्याची संधी द्या.

चित्र काढा झावळीची फांदी मुलांना तसे चित्र काढण्यास सांगा.



- मोठ्या मुलांना नारळाच्या झाडाचे चित्र काढायला आवडेल.



- मुलांनी आपली चित्रे मोठ्या माणसांना उपासनेच्या वेळी दाखवून आपल्याला प्रभु व राजा म्हणून ख्रिस्ताची कशी स्तुती करता येते हे समजते हे समजून सांगा.

**पाठ करा** योहान 14:6

**प्रार्थना:** ''प्रिय प्रभू, तूच आमचा एकमेव देव आहेस आम्ही तुझी उपासना करतो. अद्याप काही लोकांना तू खरोखर कोण आहेस हे माहीत नसले तरी तू किती अद्‌भुत आहेस हे आम्हाला ठाऊक आहे; म्हणूनच आम्ही तुझी स्तुती करतो. इतरांनाही तुझी स्तुती करता यावी यासाठी त्यांना तुझ्या बद्दल सांगण्यास आमचे साहाय्य कर.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net